नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २२/०८/२०२५ ( शुक्रवार )

---

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, जिल्हा यांनी आगामी येणाऱ्या गणेशोत्वस आणि ईद —ए— मिलाद च्या बंदोबस्त/ उपाययोजना बाबत घेतली आढावा बैठक

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद ए मिलाद या सणोत्सव बंदोबस्त असल्याने एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकीत श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक यांच्या सह जिल्ह्यातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी आणि शाखा प्रमुख हजर होते. सणोत्सवाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. यावर्षी सार्वजनिक गणेशोत्सव विसर्जन तसेच ईद हे दोन्ही सन एकाच कालावधीत असल्याने सणोत्सवाच्या काळात उपविभाग स्तरावरील तसेच पोलीस स्टेशन स्तरावरील गोपनिय यंत्रणा सतर्क ठेवण्याबाबत सुचना दिल्या.

दोन्ही सणोत्सव दरम्यान सार्वजनिक ठिकाणी आक्षेपार्ह फलक अथवा झाकी यास परवानगी न देण्याबबत, मिरवणुकीत अश्लिल गाणे किंवा घोषणा होणार नाही याबाबत दक्षता घेण्याच्या सुचना देण्यात आल्या. सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन गर्दीच्या ठिकाणी विशेषत: मोठे गणेश मंडळ तसेच गणेश विसर्जन स्थळांवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्याबाबत तसेच इतर संबधीत विभागासह विसर्जन मार्गाची पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभाग/नगर परिषद/ग्रामपंचायत कडुन मार्ग दुरूस्ती करून घ्यावे. तसेच विर्सजन मार्ग तसेच इतर ठिकाणचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासणी करून बिघाड झालेले सी.सी.टी.व्ही कॅमेरे तात्काळ दुरूस्ती करवुन घेण्याचे आदेश दिले. ज्या ठिकाणी मोठया स्वरूपाच्या गणपती ची मुर्ती तयार करण्यात येते अश्या ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त नेमावा. उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी पोलीस ठाणे

स्तरावर दंगा काबु योजनेचे सराव घ्यावा. अवैध धंदयावर जास्तीत जास्त कारवाई करण्याचे आदेश दिले. सणोत्सवाच्या काळात गर्दीच्या ठिकाणी तसेच संवेदनशिल ठिकाणी उपविभागिय पोलीस अधिकारी तसेच पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी पायदळ पेट्रोलींग करण्यात बाबत, ०२ किंवा त्यापेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेले गुन्हेगारावंर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यातबाबत सुचना देण्यात आल्या. या दरम्यान सोशल मिडीयावर सतत लक्ष देवुन मॅनिटरींग करण्यात येणार आहे. वाहतूक व्यवस्थापना संदर्भात गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांचे योग्य नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. डि.जे. वादयाला परवानगी देण्यात येवु नये. ध्वनी प्रदुषण कायदान्वये कायदेशिर कार्यवाही करण्याबाबत सुचना दिल्या.

उपविभागिय पोलीस अधिकारी तसेच पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी सणोत्सवादरम्यान शांतता राखण्यासाठी पोलीस ठाण्याच्या स्तरावर तसेच गावात जावुन शांतता समितीची बैठक, मौलाना बैठक आयोजित करावी, जेणेकरून स्थानिक नागरिकांना विश्वासात घेऊन उत्सवाचे नियोजन करता येईल. सामाजिक सलोखा राखण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांनी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांयांशी संवाद साधून सामाजिक सलोखा आणि एकोपा कायम राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्याबाबत सुचित केले.

सदर बैठकीत मा. पोलीस अधिक्षकांनी सर्व अधिकाऱ्यांना गणेशोत्सवादरम्यान दक्ष राहण्याचे आणि कोणत्याही अनुचित प्रकाराला आळा घालण्यासाठी त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

## मोकाट कुत्र्यांचा होणार त्रास आणि त्या संदर्भात उपाययोजना सदंर्भात मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी काढला कलम ४४ महाराष्ट्र पोलीस कायद्‌यान्वये आदेश

दिनांक २०/०८/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण ,पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री हर्ष ए. पोद्‌दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सार्वजनिक ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा होणार त्रास आणि त्या संदर्भात उपाययोजना करण्याबाबत नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व १७ नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी/ प्रतिनिधी, सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि सर्व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी

यांची बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीच्या अनुषंगाने आज दिनांक २२/०८/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ४४ अन्वये आदेश काढुन ग्रामीण जिल्हयातील सर्व १७ नगरपरिषद/नगरपंचायत मुख्याधिकारी यांना आपआपल्या कार्यक्षेत्रात खालील नमुद उपाययोजना मोहीम तात्काळ सुरू करण्याकरीता निर्देश दिले. तसेच उपविभागिय पोलीस अधिकारी तसेच पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनासुध्दा निर्देश देण्यात आले.

१.नगरपरिषद/नगरपंचायत यांच्या मार्फतीने मोकाट कुत्र्यांचे अॅन्टी रेबीज लसीकरण करण्याबाबत मोहीम राबविण्यात यावे, २. मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण (नसबंदी) करण्यात यावी, ३.मोकाट कुत्र्यांना खाऊ घालण्यासाठी प्रत्येक नगरपरिषद/नगरपंचायत हद्दीत निश्चित जागा ठरविणे. सदरचे ठिकाण हे धार्मिक स्थळे, शौक्षणिक संस्था,जेष्ठ नागरिक यांच्या वावरण्याचे ठिकाणी तसेच गर्दीच्या ठिकाणाजवळ नसावे ४. पाळीव कुत्र्यांकरीता परवाना बंधनकारक असावा तसेच त्याबाबत नियमावली तयार करून नियमांचे पालन करणाऱ्यांनाच परावाना दयावा. ५. मोकाट कुत्र्यांबाबत हेल्प लाईन क्रमांक/संपर्क क्रमांक तयार करून त्याबाबत अधिकाधिक प्रसिध्दी देण्यासाठी फलक लावणे आणि ६. मुख्याधिकारी सावनेर आणि उमरेड यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात मोकाट कुत्र्यांकरीता शेल्टर होम सुरू करावे.

**सदर उपाययोजना मोहीम तात्काळ सुरू करण्याकरीता निर्देश दिले. त्याच प्रमाणे सदर मोहीम राविताना मागणी झाल्यास तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रशन निर्माण झाल्यास तात्काळ पोलीस बंदोबस्त पुरविण्यात येणार आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ८३ अधिकारी/अंमलदार यांना प्रशस्तीप्रत देवुन गौरविण्यात आले.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ८३ पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या कामाची दखल घेवुन त्यांनी केलेल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनिय कामगिरी साठी दिनांक २१/०८/२०२५ रोजी झालेल्या आढावा बैठकीत त्यांना प्रशस्तीप्रत देवुन गौरविण्यात आले.

१. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत गडमंदीर बंदोबस्त योग्य पद्धतीने हाताळुन पार पाडल्याबाबत** श्री अनिल म्हस्के, अप्पर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग पोलीस निरीक्षक पोलीस

निरीक्षक राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी,रवींद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक पोलीस हवालदार परमेश्वर वाघमारे

२. **पोलीस स्टेशन पारशिवणी येथील खुनाच्या गुन्हयातील अज्ञात आरोपीला निष्पन्न करून अटक करून गुन्हा उघडकीस आणल्याबाबत** पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पारशिवणी, सपोनि मनोज गदादे सपोनि किशोर शेरकी, पोलीस हवालदार मुदस्सर जमाल, चालक सफौ संदीप बलेकर, पोलीस अंमलदार वीरू नरड,पृथ्वीराज चव्हाण, विरेंद्रसिंग चौधरी, राकेश बंधाटे, सुरज मोहेकर, जगदीश उइके पोलीस स्टेशन पारशिवनी यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.

३. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्या प्रकरणी मा. न्याययात साक्षीदारांना हजर ठेवुन वेळोवेळी सदर प्रकरणाकडे लक्ष देवुन न्यायालयाच्या कामाकाज योग्य मदत केल्याने आरोपीस शिक्षा लागली**. सदर प्रकरणी पोलीस हवालदार रोहित मांडवगडे पोलीस स्टेशन रामटेक यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.

४. **सावनेर शहरात सी.सी.टी.व्ही प्रकल्प मुदतीत कार्यन्वीत केल्याची कामगिरी केल्याने** पोलीस निरीक्षक उमेश पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर, सपोनि मंगला मोकाशे, पोउपनि स्वप्निल गेडाम, पोलिस हवालदार अतुल खोडकर पोलिस हवलदार सुनील तलमले, पोलीस स्टेशन सावनेर यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.सावनेर शहरात सी. सी.टी.व्ही प्रकल्प उद्घाटन सोहळयाचे सुत्रसंचालन केल्याने पोउपनि ज्योत्स्ना गिरी प्रभारी अधिकारी मानव संसाधन शाखा यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.

५. **पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील हरवलेले मोबाईत तांत्रिक पध्दतीने शोधुन मुळ मालकांना परत केल्याचे** कामगिरी साठी पोलीस अंमलदार नितेश परखड पोलीस स्टेशन सावनेर यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.

६. **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत अंमली पदार्थ एम.डी ची अैवधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद करून मुद्देमाल जप्त केल्या प्रकरणी** उल्लेखणीय कामगिरी साठी पोलीस निरीक्षक धनाजी जळक, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन उमरेड, पोउपनि माणिक गुट्टे, पोउपनि किरण महागाव, पोलिस हवालदार राधेशाम कांबळे, रमेश खरकटे, पोलीस नाईक पंकज बटटे, पोलीस अंमलदार गोवर्धन सहारे चेतन माहुलकर, सचिन हटवार पोलीस स्टेशन उमरेड यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.

७. **पोलीस स्टेशन बुटीबोरी अंतर्गत अग्निशस्त्रांचा धाक दाखवुन दरोडा प्रकरणी आरोपी निष्पन्न करून गुन्हा उघडकीस आणल्याबाबत** पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण, सपोनि किशोर शेरकी, मनोज गदादे, सागर गोमासे, विनोद काळे मिलिंद नांदूरकर, संजय बांधते संजय बांते, संजय बदोरिया, प्रमोद भोयर, रोहन डाखोरे, विष्णू जायभाये, हेमंत रंगारी स्थानिक गुन्हे शाखा आणि सपोनि निलेश चवरे, पोलिस हवालदार प्रविण देव्हारे, पोलीस अंमलदार रामराव आडे, कुणाल आरगुडे पोलीस स्टेशन बुटीबोरी यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.

८. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत अग्निशस्त्रांचा धाक दाखवुन दरोडा प्रकरणी आरोपी निष्पन्न करून गुन्हा उघडकीस आणल्याबाबत** सपोनि प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, श्रेणी पोउपनि मुन्ना ठाकूर, पोलीस हवालदार संतोष तिवारी ,श्रीकांत बोरकर, राजु तायडे, विनायक सातव आणि पोलीस अंमलदार दीप पांडे पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.

९. **पोलीस स्टेशन कोंढाळी येथील खुनाच्या गुन्हयातील अज्ञात आरोपीतांना निष्पन्न करून** अटक करून गुन्हा उघडकीस आणल्याबाबत पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थानिक

गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण, सपोनि किशोर शेरकी, विजय चन्नोर, मनोज गदादे, राजकुमार त्रिपाठी , आशिषसिंह ठाकुर, पोउपनि धवल देशमुख, संकेत नानोटी सफौ जयसिंग पवार, पोहवा सुनील ठोंबरे, नितेश राठोड अब्दुल राजीक शेख, इक्बाल शेख, शैलेश यादव, संजय पांडे, संजय बदोरीया, प्रमोद भोयर, रोहन डाखोरे, विष्णू जायभाये, राहूल पाटील, आशुतोष लांजेवार, अमित पवार, गोविंद मैद, विवके गाडगे, मपोअं उषा शिंदे, यांना प्रशस्तीप्रत्र देण्यात आले.



## पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत सराईत गुन्हेगार गणेश यशवंत जुनघरे याला एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत राहणारा सराईत आरोपी नामे गणेश यशवंत जुनघरे, वय ३९ वर्षे, रा. परदेशी मोहल्ला, कावरापेठ, उमरेड याचेवर नागपुर ग्रामीण जिल्हयात व ईतर जिल्हयात अवैध रेती चोरीचे ८ गुन्हे नोंद आहे. तो सदर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. असे गुन्हे करून तो शासनाचा महसुल बुडवतो. नागपुर ग्रामीण पोलीसांनी त्याचेविरूध्द कारवाई करून

गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी गणेश यशवंत जुनघरे याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली उमरेड पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक २१/०८/२०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार गणेश यशवंत जुनघरे याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता उमरेड पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला अटक करून मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले आहे.



**गणेश यशवंत जुनघरे**

## अवैधरित्या मोहफुल गावठी हातभट्टी दारू काढणारे तसेच देशी दारू बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हे नोंद, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २१/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथकाने पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत मौजा गरडापार पारधी बेडा व मौजा ब्राम्हणी येथे अवैध दारू बाबत खालील प्रमाणे कारवाई करून ५ गुन्हे नोंद केले.

**१**.महीला आरोपीचे ताब्यातुन मोहाफुल सडवा एकुण ६०० लिटर प्रत्येकी किंमती २१००० रू आणि ४० लिटर मोहाफुल गावठी दारू किमती ४००० रूपये असा एकुण २५०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला, **२**.महीला आरोपीचे ताब्यातुन मोहाफुल सडवा एकुण ४०० लिटर प्रत्येकी किंमती १४,००० रू आणि २० लिटर मोहाफुल गावठी दारू किमती २००० रूपये असा एकुण १६०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला, **३**.मनोहर एलया बडगेवार, वय ७० वर्षे, रा. ब्राह्मणी ता. उमरेड याच्या ताब्यातुन कोकण देशी दारूच्या २० नीपा किंमती १६०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला, **४.** प्रभू राजाराम मांढरे वय ६० वर्षे, रा. ब्राह्मणी ता. उमरेड याच्या ताब्यातुन कोकण देशी दारूच्या २४ नीपा किंमती १९२० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला, **५.** वसंता आंबोणे वय ५७ वर्श रा. ब्राह्मणी ता. उमरेड याच्या ताब्यातुन कोकण देशी दारूच्या २४ नीपा किंमती १९२० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. वर प्रमाणे एकुण ४६,४४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये ५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक २१/०८/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की मौजा चांपा, सावनेर येथे आरोपी विक्की बोबडे रा.चांपा याच्या आजीच्या मालकीच्या गाईच्या गोठयात काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी जावुन धाड टाकली असता आरोपी नामे १) अक्षय लिलाधर चिकटे रा वार्ड क्र ४ एसबीआय बॅकजवळ पाटणसाावंगी सावनेर, २) नितेश राजेंद्र कडू रा शिक्षक कॉलनी वार्ड क्र ३ पाटणसावंगी सावनेर,३) प्रशांत सुधाकर कहले रा वार्ड क्र ४ पाचपावली चौक पाटणसावंगी, ४) विक्की उर्फ विकास रमेश चापले रा वाार्ड क्र ३ टाकळी भंसााळी सावनेर,५) अभिलाष चिंतामन बोंद्र रा शिक्षक कॉलनी वार्ड क्र ३ पाटणसावंगी साावनेर,६) हर्शल पुरूषोत्तम काकडे रा चांपा सावनेर ७) विक्की ज्ञानेश्वर बोबडे रा. चांपा, सावनेर, ८) सौरभ हिमत कोहळे रा चांपा साावनेर ,९) भास्कर काकडे रा चांपा सावनेर असे आरोपी ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या **ताब्यातुन ५२ तास पत्ते**

**व रोख रक्कम ७,८००/— रूपये, पाच ॲंड्रॉईड मोबाईल दोन दुचाकी वाहने असा एकुण १,३२,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे ४,५ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयात घेण्यात आल्या शांतता समिती बैठक

सणोत्सवाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस स्टेशन मौदा आणि रामटेक येथे आज दिनांक २२/०८/२०२५ शांतता समिती बैठक घेण्यात आल्या.

**पोलीस स्टेशन मौदा :—** श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग कन्हान यांचे अध्यक्षतेखाली ईद—ए—मिलाद निमित्त मस्जिदचे मौलाना व ईद निमित्य मिरवणूकचे आयोजक पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्था राखण्याची बाबत सुचना देवुन योग्य मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मौजा भुगांव येथे पोळ्याच्या पाडव्याला मोठी मिरवणूक काढण्यात येते. त्या अनुषंगाने श्री संतोष गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी आणि श्री सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी, रामटेक यांनी भुगांव येथे भेट देऊन गावातील सरपंच उपसरपंच मिरवणुकीचे आयोजन करणारे तसेच जेष्ठ नागरिक यांचेशी चर्चा करून कार्यक्रम शांततेत करण्याबाबतचे आवाहन करण्यात आले.

**पोलीस स्टेशन रामटेक** :— अंतर्गत श्री रविंद्र मानकर, पोलीस निरीक्षक रामटेक यांनी मौजा शितलवाडी आणि पटगोवारी येथे शांतता समितीची बैठक घेतली बैठकीमध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य प्रतिष्ठित नागरिक, गणेश मंडळाचे पदाधिकारी हे उपस्थित होत. बैठकीमध्ये सणोत्सव संबंधाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.






## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २१/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २२/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती वृष्टि जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन

कुही  अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले.  सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती वृष्टी जैन यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये कुही पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने